**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय**
**कार्यपत्रिका क्रमांक ५**
**सभावृत्तांत**

दिनांक:- १४ / ८ / २०१५ वेळ. दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक १४ / ८ / २०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील “राजर्षी शाहु महाराज सभागृहात” आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. बो-हाडे शुभांगी संजय सभापती
२. मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा..भालेकर अरुणा दिलीप
५. मा. सायकर अजय शंकरराव
६. मा. जाधव साधना रामदास
७. मा. जाधव राहुल गुलाब
८. मा. पवार संगीता शाम
९. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
१०. मा. तानाजी विठ्ठल खाडे
११. मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित
१२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१३. मा.श्री.मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.प्रकाश देशमाने कार्यालयीन अधिक्षक तथा सभासचिव, श्री..सतिश इंगळे कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.संदेश चव्हाण कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.लियाकत पिरजादे कार्यकारी अभियंता.(पाणीपुरवठा), श्री.पांडुरंग जाधव (लेखाधिकारी), श्री.नायकवाडी बी.एस. (लेखापाल), श्री.राणे आर.व्ही.,उपअभियंता (स्थापत्य), श्री. हनुमंत शिंदे, उपअभियंता (जलनि:सारण), श्री.नरोटे एस.एल. उपअभियंता (स्थापत्य),श्री.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्थापत्य उद्यान), श्री.गायकवाड पी.एम.(उद्यान अधिक्षक), श्री.मोरे चंद्रकांत चिंधा (हॉर्टी. सुपरवायझर), श्री.ई.एच.बंडवल (हॉर्टी.सुपरवायझर), श्रीम.प्रभावती गाडेकर (कार्यालयीन अधिक्षक) इ. अधिकारी सभेस हजर होते.

खालीलप्रमाणे सूचना मांडण्यात आली.

सुचक:- मा.राहुल जाधव अनुमोदक:- मा.मंदाकिनी ठाकरे

थोरशास्त्रज्ञ व भारताचे माजी राष्ट्रपती मा.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे दु:खद निधन झाले असल्याने श्रध्दांजली वाहून शुक्रवार दिनांक १४/०८/२०१५ रोजीची सभा १० मिनिटे तहकुब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.सभापती यांनी सभा १० मिनिटे तहकुब करुन सभा पुन:श्च सुरु करावी,असे सूचीत केले.

सही/-

मा.सौ.शुभांगी संजय बो-हाडे

सभापती

फ क्षेत्रीय कार्यालय

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय**
**कार्यपत्रिका क्रमांक ५**
**सभावृत्तांत**
**(दि.१४/८/२०१५ ची तहकुब सभा)**

दिनांक:- १४ / ८ / २०१५ वेळ. दुपारी १२.१० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची फ प्रभाग समितीची दि.१४/८/२०१५ ची मासिक तहकुब सभा दिनांक १४ /८ / २०१५ रोजी दुपारी १२.१० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील “राजर्षी शाहु महाराज सभागृहात” आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. बो-हाडे शुभांगी संजय सभापती
२. मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा..भालेकर अरुणा दिलीप
५. मा. सायकर अजय शंकरराव
६. मा. जाधव साधना रामदास
७. मा. जाधव राहुल गुलाब
८. मा. पवार संगीता शाम
९. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
१०. मा. तानाजी विठ्ठल खाडे
११. मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित
१२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१३. मा.श्री.मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.प्रकाश देशमाने कार्यालयीन अधिक्षक तथा सभासचिव, श्री..सतिश इंगळे कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.संदेश चव्हाण कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.लियाकत पिरजादे कार्यकारी अभियंता.(पाणीपुरवठा), श्री.पांडुरंग जाधव (लेखाधिकारी), श्री.नायकवाडी बी.एस. (लेखापाल), श्री.राणे आर.व्ही.,उपअभियंता (स्थापत्य), श्री. हनुमंत शिंदे, उपअभियंता (जलनि:सारण), श्री.नरोटे एस.एल. उपअभियंता (स्थापत्य),श्री.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्थापत्य उद्यान), श्री.गायकवाड पी.एम.(उद्यान अधिक्षक), श्री.मोरे चंद्रकांत चिंधा (हॉर्टी. सुपरवायझर), श्री.ई.एच.बंडवल (हॉर्टी.सुपरवायझर), श्रीम.प्रभावती गाडेकर (कार्यालयीन अधिक्षक) इ. अधिकारी सभेस हजर होते.

<u>सन्मा.सदस्य/सदस्या यांनी खालील मुद्दयांवर चर्चा केली.</u>
**मा.पौर्णिमा सोनवणे -** प्रभागात जास्त दाबाने पाणीपुरवठा होत नाही. दोन-तीन ठिकाणी चुकीची नळ जोडणी झालेली आहे. (दक्षिणमुखी मारुती मंदीराजवळ)

**मा.तानाजी खाडे** – विदयुत विषयक मेटेन्सन्सची कामे होत नाहीत. कर्मचारी कमी आहेत. परिसरात चो-यांचे प्रमाण वाढले आहे. व ब-याच ठिकाणी अंतर्गत विद्युत खांबाचे दिवे बंद असतात.

श्री.चव्हाण (का.अ.वि) - चालु वर्षाचे टेंडर रेट मागविलेले आहेत. ते अजुन ठरलेले नसल्याने ठेकेदार नियुक्ती केलेली नाही. कर्मचारी मागणी केली आहे. अद्याप मिळालेले नाहीत.

**मा.तानाजी खाडे:-** .आयुक्त साहेबांचा निषेध करतो. प्रभागातील कर्मचा-यांचा आढावा न घेता कर्मचा-यांच्या बदल्या करतात. ही बाब निंदनिय आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे**:- मागील ३-४ च्या मिटींगला हा विषय चर्चा झालेला आहे. पावसाळयाचे दिवस असतात व अनेक समस्या आहेत तरी कर्मचारी बदल्या का होतात हे कळत नाही. कृपया श्री. चव्हाण सो. यांनी माहिती दयावी.

श्री. चव्हाण - (का.अ.वि) - फ आणि ई प्रभागातील विद्युत विषयक समस्या बाबत ई प्रभागात मागील महिन्यात मिटींग झाली होती. त्यावेळी ई प्रभागात १६ हजार आणि १२ हजार फ प्रभागात विजदिवे आहेत. या निकषावर कर्मचारी बदल्या केल्या आहेत. प्रति हजारी १ वायरमन या हिशोबाने आणखी ४ वायरमन कर्मचारी मागणी केली आहे.
**मा. अध्यक्षा** – श्री. चव्हाण सो. यांना विद्युत विषयक तक्रारींचे निवारण व्हावे. यासाठी आयुक्त सो. यांचेबरोबर मिटींग आयोजित करावी.

**मा.शांताराम भालेकर**:- आरोग्यविषयक तक्रारी आहेत. डेंग्युची साथ मोठया प्रमाणात सुरु आहे. औषध फवारणी सर्व प्रभागात सम प्रमाणात व्हावी.

**मा.साधना जाधव**:- चिखली भागात पाणीपुरठा अपु-या प्रमाणात येत आहे. लोकांना खुप अडचण होते. तक्रारी वाढतचं आहेत. याबाबत योग्य नियोजन करावे.
श्री. शिंदे (क.अ.पा.पु):- भैरवनाथ मंदीराजवळचा भाग चढाचा असलेने या भागात उशीराने पाणीपुरवठा होतो.

**मा.साधना जाधव**:- १.जाधववाडीत पण पाण्याचा प्रॉब्लेम आहे. दोन मोटारपंप आहेत. एक सतत खराब होतो.. दुस-यावर ताण येतो. या भागासाठी नवीन मोटारपंप खरेदी करुन तक्रार दुर करावी.

२. सावतामाळी मंदिर ते विसावा हॉटेल अर्धवट रस्ता व जवळील चौकातील रस्ता पूर्ण करणे.

३.दत्तनगर अर्धवट रस्ता पूर्ण करणे,

४. पथदर्शक नावांचे बोर्ड लावणे

५. जाधववाडी/कुदळवाडी खड्डे भरुन रस्ता करणे

६. जाधववाडी/कुदळवाडी झाडे लावणे

७. ड्रेनेज लाईन टाकलेल्या ठिकाणी चेंबरवर झाकण बसविणे

८. गतिरोधक बसविणे

९. औषध फवारणी वेळेवर व्हावी

१०.कचराकुंडया वेळेपूर्वी उचलणे, ड्रेनेज झाकणे बसविणे

**मा. राहुल जाधव**:- या भागात रात्री १२ च्या आसपास पाणी येते. संध्याकाळी ८ ते १० या वेळेत पाणीपुरवठा करावा. से.क्र.१३ येथे पाण्याची टाकी टाटा कंपनीकडून बांधून दिली आहे. मनपाची टाकी जमिनीखाली अर्धी जमीनीवर अर्धी आहे. लोक या टाकीतून शेंदुन पाणी घेतात, ही जोखीम आहे. काळजीने ही समस्या निवारण करावी.

श्री. पिरजादे (का.अ.पा.पु) - वरील विषयाची माहिती घेवून समस्या कशी दूर करता येईल ते पाहतो. नवीन टाकी साठी तरतूद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**मा.राहुल जाधव**:- १.बकेट वाटप अर्धवट झाले आहे. बकेट वाटपाची यादी अद्यापपर्यंत मिळालेली नाही.

श्री.कुलकर्णी (प्र.सहा.आरो.अधि.) - यादी देणेत येईल.

२. मोकाट कुत्री त्रास देत आहेत याच काय झाले ?

श्री. माळी:- (आ. नि) - अनीमल हजबंडरी संस्थेकडून दोन एजन्सी साठी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

३.सावतामाळी मंदीर ते विसावा हॉटेल चौकात मोठे खड्डे आहेत. अपघात होतात.

श्री.नरोटे (उप.अभि.स्था) - खड्डे बुजवण्याचे काम सुरु होते. पावसामुळे थांबवले आता पुन्हा सुरु करु

**मा.साधना जाधव**:- . रस्त्याच्या/चौकाच्या नावाचे बोर्ड अजुन लागले नाही. रस्ता नंतर वाढवा. सावतामाळी मंदीरामागची झाडे मोठे वाढली आहेत. रस्त्यात अडचण येत आहे.ती झाडे काढुन नवीन झाडे लावावी.

**मा. संगीता पवार**:- ड्रेनेज चोकअप होवून पाणी घरात शिरत आहे.

श्री.शितोळे (क.अ.झोनिपु) - राडारोडा/कचरा काढणेचे काम सुरु आहे. ठेकेदार उपलब्ध नाही. उपलब्ध झाल्यावर काम पूर्ण होईल

**मा.अध्यक्षा**:- श्री.शितोळे (क.अ.झोनिपु) - काम लवकर पूर्ण करावे.

**मा.संगीता पवार**:- लाईट व्यवस्था बंद आहे.

श्री.चव्हाण (का.अ.वि.) - डीपी चे काम सुरु आहे. ते झाल्यानंतर लाईट सुरु होतील.आकडी टाकून वीज चोरी होते.

**मा.सुलभा उबाळे**:- विजेची चोरी करणा-यांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा.

श्री.चव्हाण (का.अ.वि.) - प्रभाग अधिकारी यांचेबरोबर याबाबत ही कारवाई करण्याची चर्चा केली होती. तथापी पोलीस बंदोबस्त अद्याप मिळालेला नाही.

**मा.सुलभा उबाळे**:- हे कागदी उत्तर झाले. खरी परिस्थिती आम्हाला सांगा. आम्ही पाठपुरावा करु

श्री.चव्हाण (का.अ.वि.) - ठीक आहे. याबाबत मी पुन्हा प्रयत्न करतो.

**मा. अजय सायकर**:- १. पाणीपुरवठया विषयी पुर्णानगर येथे काम केले होते. एक महिन्यांपासुन पुन्हा या भागात तक्रारी वाढल्या आहेत.

श्री.पिरजादे (का.अ.पा.पु.) - ही समस्या दुर करुन तीन दिवसापूर्वी आपणास त्याबाबत फोन केलेला आहे.

२.शिवसाई नगर ते ब्रम्हा,विष्णु, महेश रस्त्यावर मोठे खड्डे झाले आहेत ते तातडीने दुरुस्त व्हावेत.

३.वॉर्डात आरोग्याच्या खुप तक्रारी आहेत. डेंग्युसाठी दररोज औषध फवारणी करावी. मोकाट कुत्री दिवसा पकडता येणार नाहीत ते काम एजन्सीमार्फत रात्रीचे वेळी करावे कारण लोकांना ये-जा करण्यास त्रास होतो.

४. विदयुत अधिकारी /कर्मचारी रजेवर असल्यास त्यांचा बदल्यात योग्य व्यवस्था झाली पाहिजे.

श्री.चव्हाण (का.अ.वि.) - मा. आयुक्त सो. यांनी नव्याने दिलेल्या आदेशाप्रमाणे डयुटी अवर्स बदलले आहेत.

५. भिमशक्तीनगर चौकात चेंबर्सचे काम अपुर्ण आहे ते पूर्ण करावे.

श्री.शिंदे ( क. अ.झोनिपु) - सोमवारी काम सुरु करु

**मा.मंदाकिनी ठाकरे -** ड्रेनेज लाईन जोडली नाही. नागरिकांच्या तक्रारी आहेत.

श्री.शिंदे (क.अ.अभि.पापु) - काम लवकरात लवकर करुन घेवू

मा.मंदाकिनी ठाकरे:- मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे

श्री.माळी (आ.नि) - प्रस्ताव मान्यतेकामी ठेवला आहे तो मान्य झाला की कार्यवाही सुरु होईल.

**मा.सुरेश म्हेत्रे**:- .ड्रेनेज कामाच्या एजन्सी निश्चित झाल्या आहेत. त्यांच्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे संपर्क क्रमांक सर्व सदस्यांना दयावे.

**मा.सुरेश म्हेत्रे:-** स्थापत्य विभागाच्या निविदांचा तपशील इंगळे सो.यांनी दयावा.

श्री.इंगळे सो:- आज अखेरच्या कामांच्या स्थितीचा तपशील वाचून दाखवला. याबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. त्यानंतर काम कशा पध्दतीने ठेकेदाराकडून करुन घ्यायचे आहे. याबाबत स्थापत्य विभागाच्या स्टाफला सुचना दिल्या आहेत.

२. उद्यान विभागाचे प्रभाग ४ टेंडरचे काम झाले का ? वृक्षारोपन करावयाचे आहे. स्प्रेईंग धुरीकरणासाठी माणसे वाढवा. साथीचे आजार वाढत आहेत, ट्रॅक्टर वाढवा.

**मा.अध्यक्षा**:- दि. २१/८/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्विकृत सदस्य नियुक्तीबाबत विशेष सभा आयोजीत केली आहे. तरी सर्व सन्मा.सदस्य यांनी उपस्थित रहावे.

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.</u>

**विषय क्र.२** फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तीन स्वीकृत सदस्य निवडीबाबतचा विषय फ प्रभाग समितीसमोर मान्यतेकामी ठेवणेबाबत
मा.जाधव साधना व मा.पवार संगीता यांचा प्रस्ताव

विषय क्र.३ प्रभाग क्र.४ कृष्णानगर म्हेत्रेवाडी चिखली अंतर्गत दवाखाना व पोलीस चौकी इमारत रस्त्यावर कमान उभारणेबाबत
सायकर अजय व मा. जाधव राहुल यांचा प्रस्ताव

ठराव क्र.१२ विषय क्र.१
दि.१४/८/२०१५ विभाग:-
**सुचक**:- मा.जाधव साधना रामदास अनुमोदक:- मा. भालेकर अरुणा दिलीप
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/सभा/कावि/१०९/२०१५ दि. ३/०८/२०१५ चा प्रस्ताव

मा.भारत निवडणुक आयोग यांचेमार्फत दि.३/०३/२०१५ पासुन राष्ट्रीय मतदार यादी शुध्दीकरण व प्रमाणीकरण कार्यक्रम (NERPAP) सुरु करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमांतर्गत आधार क्रमांक व मतदार ओळखपत्र यांची जोडणी, नवीन मतदार नोंदणी, मतदान ओळखपत्रातील त्रुटींची दुरुस्ती, मतदार वगळणी इ. कार्यक्रम सुरु आहे.

मा.मतदान नोंदणी अधिकारी, २०६पिंपरी (अ.जा) विधानसभा मतदार संघ यांचेकडील पत्र क्र.निवडणुक/कावि/२३८/२०१५ दि.२५/७/२०१५ अन्वये मा.भारत निवडणुक आयोग व मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील निर्देषानुसार २०६ पिंपरी (अ.जा) विधानसभा मतदार संघातंर्गत १ते ३९९ मतदान केंद्रातील मयत, दुबार व स्थलांतरीत मतदारांच्या वगळणीचे कामकाज सुरु आहे. सदर कामकाजा दरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (B.L.O)यांचेमार्फत मयत, दुबार व स्थलांतरीत मतदार यांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्या नोटीसा बजावुन झालेले जबाब व पंचनामे तसेच कार्यालयामध्ये प्राप्त अर्ज यांची छाननी करुन २०६ पिंपरी ( अ.जा.) विधानसभा मतदार संघात एकुण ११९९, मयत,६४४४ दुबार व २११७ स्थलांतरीत मतदारांची वगळणी प्रस्तावित आहे. प्रस्तावित वगळणीची यादी दि.२५/७/२०१५ नंतर मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय मा.CEO महाराष्ट्र यांचे वेबसाईटवर, व मा. जिल्हाधिकारी पुणे यांचे वेबसाईटवर व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वेबसाईटवर अवलोकनार्थ उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. प्रस्तावित वगळणीबाबत मतदारास दि.७/०८/२०१५ रोजी सांयकाळी ५.३० पर्यंत मतदान नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय डॉ.हेगडेवार भवन, से.नं.२६, प्राधिकरण, निगडी पुणे ४११ ०४४ येथे हरकती/सुचना नोंदविणेसाठी मुदत विहीत करणेत आलेली आहे. मतदानाचा हक्क बजावणेकामी मतदार संघाचा मतदार यादीत नाव असणे आवश्यक असुन मतदार यादीतील नाव व तपशिल अचुक असलेबाबतची मतदारांनी खात्री करणेत यावी. तसेच सदर वगळणी प्रक्रिया दि.७/८/२०१५ नंतर पुर्ण झाल्यानंतरही कोणत्याही मतदाराला दावे व हरकती दाखल करावयाच्या असल्यास ते नव्याने नमुना ६,७,८ व ८अ द्वारे मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयात दाखल करु शकतात.असे कळविणेत आले असुन सदरचा प्रस्ताव मा.प्रभाग समिती पुढे सादर करणेबाबत व मयत,दुबार व स्थलांतर मतदार वगळणीची बाब निदर्शनास आणलेबाबत सदरचा विषय नजीकचे मा.प्रभाग समिती सभेपुढे निर्णयार्थ मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.१३ विषय क्र.२
दि.१४/८/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.जाधव साधना रामदास अनुमोदक:- मा. पवार संगीता शाम

संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.फक्षेका/सभा/कावि/१२६/२०१५ दि.१३/८/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तीन स्वीकृत सदस्य निवडीबाबतचा विषय फ प्रभाग समितीसमोर मान्यतेकामी ठेवणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभागांतर्गत स्वीकृत सदस्य निवडीकरीता फ क्षेत्रीय कार्यालयामध्ये बिन सरकारी संघटना व समाजलक्षी संघटना यांचे सदस्यांमधून

दि. ०९/०७/२०१५ ते २४/०७/२०१५ पर्यंत कार्यालयीन कामाचे दिवशी दु ३.०० वाजेपर्यंत या कालावधीमध्ये एकूण ३३ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केलेली आहेत. त्यापैकी छाननीमध्ये २६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असून ०७ अर्ज अवैध ठरले आहेत. सदर वैध व अवैध उमेदवारांची यादी अवैधेच्या कारणासह दि. ३१/०७/२०१५ रोजी फ प्रभाग कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आली होती.

जाहिर प्रकटनामध्ये प्रसिध्द केलेप्रमाणे दिनांक ०७/०८/२०१५ रोजी दुपारी ३,०० वा. पर्यंत अर्ज अवैध झालेल्या उमेदवारांनी आक्षेप नोंदविणे आवश्यक होते. तथापि या कालावधीत कोणत्याही स्वरुपाचे आक्षेप प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे दि.१३/८/२०१५ रोजी दु. ३.०० वा. फ क्षेत्रीय कार्यालयाचे नोटीस बोर्डावर एकूण २६ वैध व ०७ अवैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणेत आली आहे.

प्रस्तुत यादीप्रमाणे वैध ठरलेल्या उमेदवारांमधून तीन नामनिर्देशित सदस्यांची निवड करणेकामी दि. २१/८/२०१५ रोजी दु. १२.०० वा.विशेष सभेचे आयोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.१४ विषय क्र.३

दि.१४/८/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.सायकर अजय शंकरराव अनुमोदक:- मा. जाधव राहुल गुलाब

संदर्भ:- मा. सायकर अजय शंकरराव व मा. जाधव राहुल गुलाब यांचा दि.१४/८/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- प्रभाग क्र.४ कृष्णानगर म्हेत्रेवाडी चिखली अंतर्गत दवाखाना व पोलीस चौकी इमारत रस्त्यावर कमान उभारणेबाबत

प्रभाग क्र.४ कृष्णानगर म्हेत्रेवाडी चिखली अंतर्गत दवाखाना व पोलीस चौकी इमारत रस्त्यावर एम.एस.स्ट्रक्चर मधील (लोखंडी) कमान उभारुन त्यावर ह.भ.प.शंकरराव म्हेत्रे दवाखाना व साने पोलीस चौकी अशा स्वरुपाचे बोर्ड लावणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

-----

मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
मा.सौ.शुभांगी संजय बो-हाडे
सभापती
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/ १४९ /२०१५

दि. ३/०९/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत:- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना